महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२ ई, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६
दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.तंशिविकापु/लले/का.अ/२०२२/ ९७४ दिनांक : १०/०६/२०२२

**कार्यालयीन आदेश -**

**विषय - राजपत्रित अधिका-यांच्या प्रलंबित कार्यमुल्यमापन अहवालाबाबत..**

संदर्भ - संचालनालयाचे पत्र क्र.१(२)/गो.अ./२०२२/८५ दिनांक-०९.०६.२०२२.

तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे या कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय संस्थांना सूचित करण्यात येते की, **गट अ व गट ब (राजपत्रित)** अधिका-यांचे सन २०१९-२० या प्रतिवेदन वर्षातील कार्यमुल्यमापन अहवाल महापार ऑनलाईन प्रणालीत नोंदविण्याबाबतच्या सुचना शासन निर्णय दि. २४.०२.२०२० नुसार निर्गमित करण्यात आल्या होत्या. त्यानुसार सन २०१९-२० च्या कार्यमुल्यमापन अहवालाबाबतची कार्यवाही महापार प्रणालीद्वारे करण्याबाबत यापूर्वीच कळविण्यात आले होते. परंतु महापार ऑनलाईन प्रणालीमध्ये काही तांत्रिक अडचणीमुळे सदरची कार्यवाही अद्याप पर्यंत प्रलंबित राहिलेली आहे. संचालनालयाच्या संदर्भीय पत्रानुसार सन २०१९-२० पासून कार्यमुल्यमापन अहवालाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. गट अ व ब मधील अधिकरी/कर्मचारी यांचे कार्यमुल्यमापन अहवाल महापार प्रणालीत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यास तांत्रिक अडचण येत असल्याने सन २०१९-२० व २०२०-२१ या प्रतिवेदन वर्षातील गोपनीय अहवाल ऑफलाईन पध्दतीने सादर करुन त्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

२. गट अ व ब मधील अधिकरी/कर्मचारी यांचे सन २०२१-२२ पासूनचे गोपनीय अहवाल महापार प्रणालीत ऑनलाई न पध्दतीनेच सादर करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

३. महापार प्रणालीत ऑनलाईन कार्यवाही करताना काही तांत्रिक अडचण उद्धभवल्यास श्री.उत्तम पार्थो, महापार तंत्रज्ञ, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई (भ्रमणध्वनी क्र. ८१०८९९४९३६) यांच्याशी संपर्क करावा.

उपरोक्त सूचनेनूसार गोपनीय अहवाल द्विप्रतीत प्रतिवेदन /पुर्नविलोकन/संस्करणासाठी दिनांक २०.०६.२०२२ पूर्वी या कार्यालयास सादर करावे.

(मा.रा. जाधव)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे

प्रत-१. सर्व शासकीय संस्थाप्रमुख पुणे विभाग यांना आवश्यक कार्यवाहीसाठी.
२. प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४६०/२१,
ई-मेल-desk1@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: १(२)/गो.अ./२०२२/ 85 दिनांक: 09 JUN 2022

प्रति,

१. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे, नाशिक , औरंगाबाद, अमरावती, नागपूर.

२. संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.

विषय :- तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील राजपत्रित अधिकाऱ्यांच्या प्रलंबित कार्यमूल्यमापन अहवालाबाबत..

संदर्भ :- उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण-१११८/प्र. क्र.२४/१८/तांशि-७, दिनांक ३० मे, २०२२.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, सन २०१९-२० पासून तंत्रशिक्षण संचालनालय, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये, शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये व शासकीय तंत्रनिकेतने यामधील गट अ व गट ब ( राजपत्रित) अधिकाऱ्यांचे सन २०१९-२०२० पासूनचे कार्यमूल्यमापन अहवाल महापार ऑनलॉईन प्रणालीत नोंदविण्याबाबतच्या सूचना शासन निर्णय दि. २४.०२.२०२० नुसार निर्गमित करण्यात आल्या होत्या त्यानुसार सन २०१९-२० च्या कार्यमुल्यामापन अहवालाबाबतची कार्यवाही महापार प्रणालीव्दारे करण्याबाबत यापूर्वीच संचालनालयाकडून कळविण्यात आले होते. परंतू महापार ऑनलाईन प्रणालीमध्ये काही तांत्रिक अडचणीमुळे सदरची कार्यवाही अद्याप पर्यंत प्रलंबित राहिलेली आहे. शासनाच्या संदर्मिय पत्रानुसार सन २०१९-२० पासून कार्यमूल्यमापन अहवालाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. गट अ व ब मधील अधिकारी/ कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल महापार प्रणालीत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यास तांत्रिक अडचण येत असल्याने सन २०२०-२१ पूर्वीचे वार्षिक गोपनीय अहवाल ऑफलाईन पध्दतीने सादर करुन त्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.
२. गट अ व ब मधील अधिकारी /कर्मचारी यांचे सन २०२१-२२ पासूनचे वार्षिक गोपनीय अहवाल महापार प्रणालीत ऑनलाईन पध्दतीनेच सादर करण्याची कार्यवाही करण्यात यावी.
३. महापार प्रणालीत ऑनलाईन कार्यवाही करताना काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास श्री. उत्तम पार्थो, महापार तंत्रज्ञ, सामान्य प्रशान विभाग, मंत्रालय, मुंबई ( भ्रमणध्वनी क्र. ८९०८९९४९३६) यांच्याशी संपर्क करावा.

तरी वरील सूचना नुसार गोपनीय अहवाल अद्यायावत करण्याची कार्यवाही जून-२०२२ अखेर पर्यंत पूर्ण करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय
आवक क्रमांक - २२५
दिनांक - १०.०६.२०२२